# हाथचलाखीने पर्स मधून चोरी करणाऱ्या महिला चोर आर्वी पोलीसांच्या जाळ्यात

दि. २७/११/२०२० रोजी फिर्यादी सुषमा प्रशांत सकसवडे ह्या राजूरा बाजार येथून आर्वी बस स्टॅन्डवर रसुलाबाद येथे जाण्याकरिता बस मधून सकाळी ११.०० वाजताचे दरम्यान खाली उतरल्या त्यानंतर १२.०० वा. चे सुमारास आर्वी पुलगाव बस लागल्याने बसमध्ये चढल्या व सीटवर बसल्यानंतर त्यांचे लक्ष त्यांचे खांद्याला असलेल्या हॅन्डबॅग मध्ये गेले तेव्हा त्यांना हॅन्डबॅग ची चैन उघडी दिसल्याने त्यांनी बॅगची पाहणी केली असता हॅन्डबॅग मधील एक छोट्या पर्समध्ये ठेऊन असलेले दोन नाकातील सोन्याची खडे अर्धा ग्राम वजनाचे अंदाजे कि. १५०० रु. व नागदी रु. ४५०० रु. असा एकुण ६००० रु. चा माल बसमध्ये चढतांना कोणीतरी अज्ञात चोरट्यानी चोरून नेल्याने फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन आर्वी चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला,

फिर्यादीच्या सांगणे प्रमाणे नमूद महिलांचा आर्वी शहर परिसरात शोध घेतला असता तश्या वर्णनाच्या दोन संशईत महिला १) पवित्रा कार्तिक उर्फ रवी बुडबुडकलो, वय ३० वर्ष, २) रेणु कार्तिक उर्फ रवी बुडबुडकलो, वय २६ वर्ष दोन्ही राहणार चिखलठा,  ता. जी. औरंगाबाद यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडे दोन नाकातील सोन्याचे खडे अर्धा ग्राम वजनाचे अंदाजे कि. १५०० रु. व नागदी रु. ४५०० रु. असा एकुण जु. कि. ६००० रु. चा माल मिळुन आल्याने त्यांनी तो माल बस स्टॅन्ड आर्वी येथून सदर महिलेच्या पर्स मधुन चोरी केल्याची कबुली दिल्याने दोन्ही महिला आरोपी यांनी ताब्यात घेण्यात आले व सदरचा गुन्हा उघडकीस आणला.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात मा. पोलीस निरीक्षक श्री संजय गायकवाड यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार रंजित जाधव, अनिल वैद्य, राजू राऊत, अतुल भोयर, सतीश नंदागवळी, प्रदीप दातारकर सर्व नेमणूक पोलीस स्टेशन आर्वी यांनी केली.